## डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे,
## फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

## शिष्यवृत्ती विभाग
### तातडीची व महत्त्वाची सूचना

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील अनुदानित व विना अनुदानित विभागातील सर्व (SC/ST/VJ NT/OBC/SBC) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत या शैक्षणिक वर्षा मधील महाराष्ट्र शासनाकडून लागू असलेल्या MAHADBT वरील शिष्यवृत्तीसाठी, तसेच स्वाधार या योजने साठी, ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती अर्ज अजूनही भरलेले नाहीत व ज्यांना अर्ज भरण्यासाठी अडचणी येत आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण विभागाकडून अर्ज भरण्याकरिता दिनांक ११-०३-२०२४ ते १३-०३-२०२४ या तीन दिवसांच्या कालावधीत कॅम्प आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी MAHADBT वरील शिष्यवृत्ती व स्वाधार या योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती किंवा फ्रीशिप चा ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी योग्य त्या प्रमाणपत्राच्या सॉफ्ट कॉपी सहित सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.०० या वेळेत अर्ज भरण्यासाठी जावे. सर्वांनी या कॅम्प मध्ये आयोजित अर्ज भरण्याच्या संकल्पनेचा लाभ घ्यावा, व जास्तीस जास्त विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरावेत व त्याची हार्ड कॉपी महाविद्यालयात येऊन शिष्यवृत्ती कार्यालयात जमा करावी.

कळावे,

दिनांक : दि. ११.०३.२०२४ ते दि. १३-०३-२०२४
वेळ : सकाळी १०.०० ते ५.०० पर्यंत.
स्थळ : सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन स.नं. १०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसमोर, येरवडा पुणे ०६.

प्रभारी प्राचार्य
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

प्रभारी प्राचार्य
फर्ग्युसन महाविद्यालय (स्वायत्त),
पुणे-४११००४.

दिनांक : ०९-०३-२०२४

महाराष्ट्र शासन

## सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mall:-acswopune@gmall.com

---

क्र.सआसकपुणे/भासशि/स्वाधार/कार्यशाळा/२३-२४/६२३० /१४७४ दि-०७.०३.२०२४

प्रति,

प्राचार्य,

अनुदानित / कायम विनाअनुदानित

व्यावसायिक / बिगर व्यावसायिक

कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये (पुणे महानगरपालिका तथा पिंपरी चिंचवड महानगरपालिका)

**विषय :** सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दि.११ मार्च २०२४ ते १३ मार्च २०२४ आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पबाबत.

**संदर्भ :** १. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई, यांचेकडिल शासन निर्णय दि.०७.०७.२०२३

२. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई, यांचेकडिल शासन निर्णय दि.१३.०६.२०१८

३. या कार्यालयाकडील पत्र क्र.क्र.५६७२ दि.दि.२७.१०.२०२३

४. या कार्यालयाकडील पत्र क्र.क्र.६३२० दि.दि.२९.११.२०२३

५. प्र.अध्यक्ष विद्यार्थी हक्क समिती,म.रा पुणे यांचेकडील पत्र क्र.१९६ दि.०५.०३.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता इत्यादी योजनेचे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्याकरिता दि. ११.१०.२०२३ पासून https://mahadbtmahalt.gov.in या संकेतस्थळावर लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता दि.०६.१०.२०२३ पासून https://swadhar.acswpune.com या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणेसाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तथापि सदर योजनांबाबतची माहिती ही विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच उपलब्ध व्हावी जेणेकरून विद्यार्थ्यांच्या अडचणींचे निरसन महाविद्यालयस्तरावरच होईल व त्यांच्या वेळेचा अपव्यय होणार नाही या करीता

Scanned with OKEN Scanner

संदर्भिय पत्र क्र.३ व ४ अन्वये या कार्यालयामार्फत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तरी देखील दोन्ही योजनांच्या संबंधित विद्यार्थ्यांच्या विविध तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत आहेत परिणामी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत प्रस्तुत कार्यालयास सादर होत नाहीत.

यास्तव संदर्भिय पत्र क्र. ५ मधील प्राप्त निवेदन व सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने दि.११.०३.२०२४ ते दि.१३.०३.२०२४ या कालावधीमध्ये कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी सदर कॅम्पबाबत आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवगत करावे व ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज भरण्यास अडचणी येत आहेत अशा विद्यार्थ्यांना सदर कॅम्प मध्ये उपस्थित राहून आपले अर्ज परिपुर्ण भरून घेणेबाबत आपले सुचना निर्गमित कराव्यात. महाविद्यालयांमध्ये प्रवेशित एकही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती तथा स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

दिनांक - दि.११.०३.२०२४ ते दि. १३.०३.२०२४ वेळ - सकाळी - १०.०० ते ५.०० वाजे पर्यंत

स्थळ - सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टेशनसमोर, येरवडा पुणे ०६

(विशाल लोंढे)
सहाय्यक आयुक्त,
समाज कल्याण, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-

१. मा.आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, म.रा पुणे
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग पुणे
३. प्र.अध्यक्ष विद्यार्थी हक्क समिती,म.रा पुणे

Scanned with OKEN Scanner